आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः13.02.2026 **वारः शुक्रवार**

---

1. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचा आज होणार समारोप
2. संरक्षण अधिग्रहण परिषदेची तीन लाख 60 हजार कोटी रुपयांच्या खरेदीला मंजुरी
3. रिझर्व बँकेकडून किसान क्रेडिट कार्डसाठी सुधारित नियमावली जारी
4. जागतिक रेडियो दिनानिमित्त आज रायपूरमध्ये जागतिक परिषदेचं आयोजन
5. बांग्लादेशच्या सार्वत्रिक निवड़णूकीत बीएनपी ने केला स्पष्ट बहुमताचा दावा आणि
6. टी-20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, भारताचा नामिबियावर विजय

अर्थमंत्री-राज्यसभा

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचा आज समारोप होणार आहे. दुसरा टप्पा 9 मार्च ते 2 एप्रिल या कालावधीत होईल. तत्पूर्वी काल अर्थ मंत्री निर्मला सीतरामन यांनी राज्यसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर दिलं. आर्थिक वाढ आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देत आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी सरकार कार्यरत आहे, असं सीतारामन यांनी सांगितलं. सरकारला महागाई नियंत्रणात ठेवण्यात तसंच विकासदर कायम ठेवण्यात यश आलं असून देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जात असल्याचं त्या म्हणाल्या. विविध कल्याणकारी योजनांवरील खर्चात कपात केल्याचे विरोधकांचे आरोप त्यांनी फेटाळून लावले. बायोफार्मा, सेमिकंडक्टर मिशन 2.0, वस्त्रोद्योग आदी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे, तसंच मनुष्यबळाचा विकास करण्यावर सरकारने लक्ष केंद्रित केल्याचं त्यांनी नमूद केलं.

औद्योगिक संबंध विधेयक

औद्योगिक संबंध संहिता दुरुस्ती विधेयकाला काल संसदेची मंजूरी मिळाली. काल एकाच दिवसात आधी लोकसभेत आणि त्यानंतर संध्याकाळी राज्यसभेने या विधेयकाला मंजूरी दिली. कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी दोन्ही सभागृहांमध्ये या विधेयकावरील चर्चेला उत्तर दिलं. चारही कामगार संहितांअंतर्गत 40 वर्षांवरील कामगारांसाठी वार्षिक आरोग्य तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. तसंच महिला आणि पुरुष कामगारांना समान कामासाठी समान वेतनाची हमी यात देण्यात आली आहे, असं मांडवीय म्हणाले. प्रत्येक तरुणाला नोकरीबरोबरच नियुक्तीपत्र देण्याची हमीही या कामगार संहितांमध्ये असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. कामगार संहितांच्या विरोधातील भूमिका ही केवळ राजकीय हेतूंनी प्रेरित असल्याचा आरोपही त्यांनी केला.

गदारोळ

दरम्यान भारत अमेरिका व्यापारी करार आणि कामगार कायदे यासह विविध मुद्दयावरून काल लोकसभेत सत्ताधारी आणि विरोधकांनी गदारोळ केला. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी भारत- अमेरिका व्यापार करारविरोधात घोषणाबाजी सुरू केली तसंच हा करार आणि चार कामगार कायदे मागे घ्यावेत अशी मागणी केली. त्यामुळे कामकाज आधी दोन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात आपण हक्कभंग नोटीस दिल्याचं भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी वार्ताहरांना सांगितलं. राहुल गांधी परदेशात जाऊन सोरोस फाऊंडेशनसह विविध संस्थांशी संधान साधत भारतविरोधी शक्तींशी हातमिळवणी करतात हे आपण आपल्या नोटीशीत सांगितल्याचं दुबे म्हणाले.

पंतप्रधान-सेवातीर्थ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत सेवा तीर्थ या नवीन सरकारी कार्यालयांच्या संकुलपरिसराचं अनावरण आणि कर्तव्य भवन एक आणि दोनचं लोकार्पणही करण्यात करण्यात येणार आहे. सेवा तीर्थ संकुलात, पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय

सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय आहे. हे नवीन संकुल आधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज आहे. कर्तव्य भवन-1 आणि 2 मध्ये अनेक प्रमुख मंत्रालयांची कार्यालये आहेत.

संरक्षण

संरक्षण अधिग्रहण परिषदेने काल सशस्त्र दलांची क्षमता वाढविण्यासाठी एकंदर तीन लाख साठ हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली. भारतीय हवाई दलासाठी राफेल लढाऊ विमानं आणि इतर लष्करी हार्डवेअर, ज्यामध्ये कॉम्बॅट क्षेपणास्त्र आणि हवाई क्षेत्र तसंच जहाजांवरून होणाऱ्या कारवाईवर आधारित हाय अल्टिट्यूड स्यूडो सॅटेलाइट यांचा समावेश आहे. खरेदी करण्यात येणारी संरक्षण सामग्रीपैकी बहुतांश वस्तू भारतीय बनावटीच्या असतील. असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. भारतीय नौदलासाठी, चार मेगावॅट मरीन गॅस टर्बाइन आधारित इलेक्ट्रिक पॉवर जनरेटर आणि लाँग रेंज मेरीटाईम रिकॉनिसन्स एअरक्राफ्टसाठी मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान, संरक्षण मंत्रालयाने आठ डॉर्नियर 228 विमानांच्या खरेदीसाठी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडसमवेत करार केला आहे. दोन हजार तीनशे बारा कोटी रुपयांच्या या करारात भारतीय तटरक्षक दलासाठी ऑपरेशनल रोल इक्विपमेंटचाही समावेश आहे.

आरबीआय

भारतीय रिझर्व्ह बँकेने किसान क्रेडिट कार्ड योजनेसाठी सुधारित नियमांचा मसुदा जारी केला आहे, यामध्ये पात्र शेती कर्ज घटकांमध्ये माती परीक्षण, हवामान अंदाज आणि सेंद्रिय प्रमाणन यासारख्या कृषी-तंत्रज्ञान उपक्रमांवरील खर्चाचा समावेश करण्याचा प्रस्ताव आहे. या मसुद्यात प्रति कर्जदार २ लाख रुपयांपर्यंतच्या कृषी आणि संलग्न कर्जांसाठीच्या नियमांमध्ये शिथिलता आणण्याची तरतूद आहे. एक हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी 10 हजार ते 50 हजार रुपयांची कर्ज देण्याचं प्रस्तावित आहे.

बांग्लादेश-निवडणूक

बांग्लादेशच्या सार्वत्रिक निवड़णूकीत बीएनपी ने स्पष्ट बहुमताचा दावा केला आहे. या निवडणुकीत 300 पैकी 197 जागांवर बीएनपीने विजय मिळवला आहे. बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान दोन्ही मतदारसंघातून विजयी झाले आहेत. माजी पंतप्रधान शेख हसीना पदावरून पायउतार झाल्यानंतर ही पहिलीच निवडणूक आहे. 299 मतदारसंघांमध्ये काल मतदान झालं. मतदानाबरोबरच जनमत चाचणीही घेण्यात आली. 'जुलै चार्टर' अंतर्गत प्रस्तावित घटनात्मक आणि संस्थात्मक सुधारणांवर नागरिकांनी मतदान केलं.

रेडियो दिन

जागतिक रेडिओ दिन आज साजरा केला जात आहे. भारतात रेडियो म्हणजे आकाशवाणी ही ओळख अनेक दशकांपासून दृढ आहे. “बहुजन हिताय, बहुजन सुखाय” या बोध वाक्यासह आकाशवाणी, स्थापनेपासून देशसेवेत कार्यरत आहे. विविध भाषा आणि वैविध्यपूर्ण श्रोता वर्ग यामुळे आकाशवाणी आज जगातील सर्वात मोठ्या प्रसारण संस्थांपैकी एक बनली आहे. ऐकुया अधिक वृत्तांत...

1946 मध्ये स्थापन झालेल्या United Nations Radioच्या स्मरणार्थ दरवर्षी 13 फेब्रुवारीला हा दिवस साजरा केला जातो. 'रेडिओ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता : एआय हे साधन आहे, आवाज नाही.' ही यंदाच्या जागतिक रेडियो दिनाची मुख्य संकल्पना आहे. प्रसारण क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या भूमिकेवर प्रकाश टाकण्याच्या उद्देशानं यंदा ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. जागतिक रेडिओ दिनानिमित्त, आज आकाशवाणी रायपूर इथं UNESCOच्या सहकार्याने जागतिक रेडियो दिन परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या परिषदेतही याच संकल्पनेवर भर दिला जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे कार्यक्रम निर्मिती, ध्वनिमुद्रणांचं संग्रहीकरण, भाषांतर, श्रोत्यांचा सहभाग आणि सुलभता यामध्ये मोठी सुधारणा होऊ शकते. त्यामुळे रेडिओ अधिक कार्यक्षम, सर्वसमावेशक आणि आधुनिक बनू शकतो. मात्र, हे तंत्रज्ञान मानवी आवाज, संपादकीय निर्णयक्षमता आणि विश्वासार्हतेची जागा घेऊ शकत नाही, त्यांना सहाय्य करणारे साधन म्हणूनच वापरले गेले पाहिजे, हा संदेश या विषयातून दिला जात आहे.

अनुदान

केंद्र सरकारने 5 राज्यांमधील ग्रामीण स्थानिक संस्थांना बळकटीसाठी चालू आर्थिक वर्षासाठीचा पंधराव्या वित्त आयोगाच्या अनुदानाचा दुसरा तीन हजार 324 कोटी रुपयांहून अधिकचा हप्ता देण्याला मंजूरी देण्यात आली आहे. बिहार, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांसाठी हे अनुदान असल्याचं पंचायती राज मंत्रालयानं काल सांगितलं.

स्वयंसेवी संस्था

महाराष्ट्र शासन आणि टाटा ट्रस्ट तसंच नाम फाउंडेशन यांच्यामध्ये काल सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. विविध स्वयंसेवी संस्थांशी राज्य शासनानं केलेल्या भागीदारीतून राज्याचं वेगाने परिवर्तन होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. या करारामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमाद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना चालना देणं आणि सर्व घटकांपर्यंत प्रमुख योजनांचा लाभ पोहोचवण्याच्या उद्देशानं हा करार करण्यात आला आहे.

वृत्तनिवेदिका माहेश्वरी निधन

दूरदर्शनच्या माजी वृत्तनिवेदिका सरला माहेश्वरी यांचं काल निधन झालं. त्या 7० वर्षांच्या होत्या. गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या. त्यांनी दूरदर्शनवर अनेक दशकं वृत्तनिवेदन केलं. जेव्हा खासगी वृत्तवाहिन्यांचं अस्तित्व नव्हतं अशा काळात त्यांनी आपल्या स्पष्ट शब्दफेकीनं आणि संयत सादरीकरणानं प्रेक्षकांच्या मनात घर केलं होतं.

टी-20 विश्वचषक

टी-20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, 'अ' गटाच्या काल नवी दिल्लीत झालेल्या सामन्यात भारताने नामिबिया संघाचा 93 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना नामीबियाला 210 धावांचं लक्ष्य दिलं. या आव्हानाचा पाठलाग करताना नामिबियाचा संघ 19 व्या षटकांत गुंडाळला गेला. इशान किशनने 24 चेंडूंत 61 धावा फटकावल्या. टी-20 विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात, अर्धशतक झळकावलेला तो पहिलाच भारतीय यष्टीरक्षक ठरला.

या स्पर्धेतील 'ब' गटाच्या काल कॅंडीत खेळल्या गेलेल्या सामन्यात, श्रीलंकेने ओमानचा 105 धावांनी पराभव केला. मुंबईत झालेल्या सामन्यात इटली संघाने नेपाळचा 10 गडी राखून पराभव केला. या स्पर्धेत आज तीन सामने खेळले जाणार आहेत. पहिला सामना कोलंबोत, ऑस्ट्रेलिया विरुद्ध झिम्बाब्वे, दूसरा सामना नवी दिल्लीत कॅनडा विरुद्ध यू ए ई, आणि तिसरा सामना चेन्नईत अमेरिका विरुद्ध नेदरलँड होणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.